अन्न व औषध प्रशासन, मुख्यालय मुंबई येथील आय.टी. प्रकल्प राबविण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी MahaIT या संस्थेकडून घेण्यात आलेल्या ०२ IT Developers यांच्या सेवा सुरू ठेवण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न व औषध विभाग
शासन निर्णय क्रमांकः MEDD-1306/12/2026-MMD(Aush-2)
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ९ वा मजला, गो. ते.रुग्णालय आवार इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००००१
तारीख: ०५ ऑगस्ट , २०२६

वाचा -

१. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, शासन निर्णय क्रमांकः मातंसं २०२२/प्र.क्र.४७/से-२/३९, दि.२७.०९.२०२२
२. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १७२५/प्र.क्र.२०६/मातं., दि.०४.०६.२०२६
३. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांचे पत्र क्र./MahaIT/१७३६/२०२६/११, दि.०९.०४.२०२६

प्रस्तावना -

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुध्दिमत्ता विभागाने त्यांच्या संदर्भ क्र.१ दि.२७.०९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून नेमण्यात आलेल्या पॅनलमधील संस्थेकडून तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याबाबत कार्यपद्धती विहीत करण्यात आली आहे. त्यामधील मुद्दा क्र.४ नुसार सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे, केंद्रशासनाने अथवा राज्य शासनाने पारित केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या व संस्था यांनी माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यीत सेवांकरीता तांत्रिक मनुष्यबळ महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फतच घेणे अनिवार्य केले आहे. सदर शासन निर्णयास संदर्भ क्र.२, दि.०४.०६.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार, अन्न व औषध प्रशासन, मुख्यालय मुंबई येथील आय.टी. प्रकल्प राबविण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी MahaIT या संस्थेकडून घेण्यात आलेल्या ०२ IT Developers यांच्या सेवा सुरू ठेवण्यास मान्यता देण्याची विनंती आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये केली आहे. त्यास अनुसरून प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय–

अन्न व औषध प्रशासन, मुख्यालय मुंबई येथील आय.टी. प्रकल्प राबविण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी MahaIT या संस्थेकडून घेण्यात आलेल्या ०२ IT Developers यांच्या सेवा सुरू ठेवण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. अन्न व औषध प्रशासनाने ०२ IT Developers मनुष्यबळासाठी सन २०२६-२७ करीताचे दरपत्रक MahalT विभागाकडून मागविण्यात यावे व सदर प्रयोजनासाठी येणाऱ्या खर्चाबाबतचा तपशिल सादर करून त्याबाबतच्या प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं २०२२/प्र.क्र.४७/से-२/३९, दि.२७.०९.२०२२ व शासन निर्णय क्र.संकीर्ण १७२५/प्र.क्र.२०६/मातं दि.०४.०६.२०२६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०५१८२११८१८५५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT RAMESH JAGTAP

Digitally signed by AJIT RAMESH JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=1C57E2746855B8B01D38F9CBD79DC87F2AF58135CF485D243D93EBF54C900920, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=62896254F9FECC7DA7B3BA8FDC28BAB4A5C1238D1090C223FD8574F24BA7CA52, cn=AJIT RAMESH JAGTAP
Date: 2026.08.05 19:03:40 +05'30'

अजित जगताप
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. महालेखापाल-महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
४. सह सचिव (औषधे), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. उप सचिव (अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी कोषागार अधिकारी, मुंबई,
८. कक्ष अधिकारी/अवर सचिव, वित्त विभाग (विनियम/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई,
९. निवडनस्ती (औषधे-२).